## कार्यकारी सारांश

१.१ जयगड पॉवर ट्रान्को लि. (जेपीटीएल) हा जेएसडब्ल्यू एनर्जी लि. (जेएसडब्ल्यूईएल) आणि महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कं. (एमआयईटीसीएल) यांचा संयुक्त उपक्रम असून २३ एप्रिल २००८ रोजी हा उपक्रम ४०० केव्ही डी/सी (क्यूयूएडी) जयगड-न्यू कोयना आणि जयगड-कराड ट्रान्समिशन लाईन्सची उभारणी, चलनवलन आणि देखभाल तसेच संलग्न साधने आणि टूर्मिनल बे यासह सुरू झाला.

१.२ माननीय आयोगाने जेपीटीएलला ट्रान्समिशन परवाना (परवाना क्र. १ सन २००८) दि. ८ फेब्रुवारी २००९ रोजी जारी केले, २५ वर्षांसाठी नियोजित ट्रान्समिशन सिस्टिमची उभारणी चलनवलन आणि देखभाल यासाठी हा परवाना आहे.

१.३ माननीय आयोगाने दि. ४ फेब्रुवारी २०११ रोजी एमवायटी रेग्युलेशन जारी केले. हे रेग्यूलेशन्स दुसऱ्या नियंत्रित कालावधीसाठी लागू झाले आहेत, याचा कालावधी आर्थिक वर्ष २०११-१२ पासून ते २०१५-१६ पर्यंत आहे.

१.४ महाराष्ट्र रेग्युलेटरी इलेक्ट्रिसिटी कमिशन (मल्टी ईयर टेरिफ) ने आपल्या पहिल्या दि. २१ ऑक्टोबर २०११ च्या सुधारणेत असे नमुद केले आहे की, ज्या युटिलिसाठी सवलतीचा आदेश नाही आणि ज्याचा टेरिफ एमवायटी रेग्युलेशन, १ एप्रिल २०११ प्रमाणे ठरविणे कठीण आहे पण जो १ एप्रिल २०१२ किंवा त्यानंतरच्या कालावधीसाठी एमईआरसी रेग्यूलेशनप्रमाणे ठरविणे आवश्यक आहे असे कमिशनला वाटते त्यांच्यासाठी एमईआरसी २००५ टेरिफ रेग्यूलेशन्स लागू आहेत.

१.५ एमवायटी रेग्यूलेशनच्या पहिल्या सुधारणेनुसार आणि माननीय आयोगाच्या दि. ०४/११/२०११ च्या पत्रानुसार जेपीटीएलने आर्थिक वर्ष २०११-१२ च्या एकूण महसूली खर्चाच्या मान्यतेसाठी याचिका दि. ३०/११/२०११ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

१.६ वरीलप्रमाणे आर्थिक वर्ष २०१०-११ चा ट्रु-अप आणि आर्थिक वर्ष २०११-१२ चा एकूण महसूली खर्च एमईआरसी रेग्युलेशन २००५ च्या अटी व शर्तींप्रमाणे केस क्र. २०११/१७० मध्ये ठरविण्यात आला.

१.७ त्यानंतर जेपीटीएलने अप्रुव्ह बिझनेस प्लॅन, आदेश दि. २०/१२/२०१२ नुसार दुसऱ्या नियंत्रित कालावधी आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एमवायटी याचिका सादर केली. माननीय आयोगाने आपल्या एमवायटी आदेशानुसार दि. १६/०८/२०१३ नुसार दुसऱ्या नियंत्रित कालावधीसाठीचा आर्थिक वर्ष २०१२-१३ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ चा एकूण महसुली खर्च मान्य केला.

१.८ माननीय कमिशनने आपल्या एमवायटी आदेश दि. १६/०८/२०१३ नुसार जेपीटीएलला आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या तिसऱ्या तिमाहीत आपल्या परफॉर्मन्सच्या मिड टर्म रूव्हयुव्हसाठी स्पष्टीकरणासह याचिका दि. ३०/११/२०१४ पर्यंत सादर करण्यास सांगितले होते.

१.९ जेपीटीएलने एमवायटी रेग्युलेशन २०११ च्या तरतूदींनुसार आपल्या दुसऱ्या नियंत्रित कालावधीसाठीची, मिड टर्म परफॉरमन्स रिव्ह्युव्हची याचिका तयार केली आहे.

१.१० जेपीटीएलने आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या एकूण महसुली खर्चाच्या ट्रु-अपसाठी आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ चा अंदाजित खर्च आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ चे सुधारित अंदाजित खर्च यांच्या मान्यतेसाठी जेपीटीएलने मिड टर्म परफॉरमन्स तपासण्यासाठीची याचिका माननीय आयोगाकडे सादर केली आहे. माननीय आयोगाकडे सादर केलेल्या याचिकेमध्ये सादरकर्त्यांने आयोगाला आर्थिक वर्ष २०१२-१३ चा दोन महिन्यांचा मुदत होऊन गेलेल्या एकूण महसुली खर्च रू. १४.४६ करोड जो दि. १४/०८/२०१४ च्या टेरिफ ऑर्डरमध्ये राहून गेला होता वहन खर्च पकडून आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या टेरिफमध्ये मान्य करण्यास सांगितले आहे.

१.११ यापूर्वी सादर केलेले आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ चे अंदाजित खर्च, माननीय आयोगाने मान्य केलेले खर्च आणि प्रत्यक्ष खर्च पुढील रकान्यात दिल्याप्रमाणे :

| **तपशिल (सर्व रकमा रू. कोटींमध्ये)** | **आधीचा अंदाजित एमआयटी पिटीशन** | | **मान्य एमवायटी ऑर्डर** | | **ॲक्च्युअल / नॉरमेटीव्ह** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **आर्थिक वर्ष १३** | **आर्थिक वर्ष १४** | **आर्थिक वर्ष १३** | **आर्थिक वर्ष १४** | **आर्थिक वर्ष १३** | **आर्थिक वर्ष १४** |
| दुरूस्त व देखभाल खर्च | ९.३१ | ९.८६ | ५.८१ | ६.१४ | ५.८१ | ६.१४ |
| एएडी व अनुषंगिक संपत्तीच्या कर्ज फेडीची तरतूद यांच्या समावशासह घसारा | २९.१७ | २९.२८ | २९.०५ | २९.०५ | २९.१३ | २९.३४ |
| लॉंग टर्म लोन कॅपिटलवरील व्याज | ४५.२२ | ४०.३१ | ४७.९७ | ४०.०४ | ४५.९८ | ४१.०४ |
| लाईनच्या उपभोक्त्यांकडील डिपॉझिटवरील व्याज | २.२५ | २.१८ | २.१८ | २.०४ | २.०८ | २.११ |
| इक्विटी भांडवलावरील परतावा | २१.४४ | २१.५५ | २१.३२ | २१.३२ | २१.४३ | २१.५८ |
| अनुषंगिक राखीव निधीसाठी योगदान | १.३९ | १.३९ | १.३८ | १.३८ | १.३९ | १.३९ |
| प्राप्ती कर | ५.३६ | ५.३९ | ५.३५ | ५.३५ | १.१७ | ६.९१ |
| स्थावर मालमत्ता राईट ऑफ वरील तोटा | | | | | २.७८ | २.९१ |
| ऑदर डेबिट (राईट ऑफ ॲसेटवरील डिप्रिसिऐशन मधील फरक) | | | | | ०.१३ | ०.०४ |
| **एकूण महसुली खर्च** | **११४.१३** | **१०९.९५** | **११३.०७** | **१०५.३३** | **१०९.३९** | **११०.४१** |
| वजा-टॅरिफ व्यतिरिक्त मिळकत | ०.०९ | ०.२० | ०.२० | ०.३२ | ०.०२ | ०.०२ |
| वजा-इतर व्यवसायातील मिळकत | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| अधिक इन्सेटिव्ह | | | | | ०.४८ | १.३४ |
| **निव्वळ महसूल खर्च** | **११४.०३** | **१०९.७५** | **११२.८६** | **१०५.०१** | **१०९.८५** | **१११.७३** |

१.१२ आर्थिक वर्ष २०१२-१३, आर्थिक वर्ष २०१३-१४ च्या महसुलाची उशिराची वसुली आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या सुरूवातीच्या दोन महिन्यांच्या महसुलाची आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ च्या मान्य केलेल्या एकूण खर्चापैकी कमी वसुलीचा सारांश खालीलप्रमाणे :

**कॅरिंग कॉस्टचा सारांश**

| **तपशिल** | **रूपये (करोड)** |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१२-१३ चा वहन खर्च | २७.४३ |
| आर्थिक वर्ष २०१३-१४ चा वहन खर्च | ११.१५ |
| आर्थिक वर्ष २०१०-११ आर्थिक वर्ष २०११-१२ च्या महसुली खर्चाची आधीच्या दोन महिन्यांची कमी वसुली | ४.८९ |
| **एकूण** | ४३.४८ |

१.१३ एमवायटी रेग्युलेशनच्या तरतूदींनुसार जेपीटीएलने आर्थिक वर्ष २०१४-१५ चे सुधारित अंदाजपत्रक, आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या पहिल्या सहामाईच्या प्रत्यक्ष खर्च आणि दुसऱ्या सहामाईच्या अंदाजित खर्चावर आधारित सादर केले आहे.

| **तपशील (सर्व संख्या करोडमध्ये)** | **पूर्वीचा अंदाज (एमवायटी याचिका)** | **मान्य (एमवाटी ऑर्डर)** | **सहामाही-१ प्रत्यक्ष** | **सहामाही-२ अंदाजे** | **एकूण अंदाजे** |
|---|---|---|---|---|---|
| दुरूस्त व देखभाल खर्च | १०.४५ | ६.५१ | ३.२६ | ३.२६ | ६.५१ |
| एएडी व अनुषंगिक संपत्तीच्या कर्ज फेडीची तरतूद यांच्या घसाऱ्यासहित | २९.२८ | २९.०५ | १४.६७ | १४.६७ | २९.३४ |
| दीर्घ कालावधीचा स्थावर मालमत्तेवरील व्याज | ३७.०० | ३६.७६ | १९.५८ | १८.६४ | ३८.२१ |
| लाईनच्या उपभोक्त्यांकडील चालू भागभांडवलावरील खर्च | २.१३ | १.९९ | १.०४ | १.०२ | २.०६ |
| इक्विटी भांडवलावरील परतावा | २१.५५ | २१.३२ | १०.८१ | १०.८१ | २१.६३ |
| अनुषंगिक राखीव निधीसाठी योगदान | १.३९ | १.३८ | ०.६९ | ०.६९ | १.३९ |
| प्राप्ती कर | ५.३९ | ५.३५ | ३.४६ | ३.४६ | ६.९१ |
| **एकूण महसुली खर्च** | **१०७.१९** | **१०२.३७** | **५३.५१** | **५२.५५** | **१०६.०६** |
| वजा-टॅरिफ व्यतिरिक्त मिळकत | ०.३२ | ०.४३ | ०.१६ | ०.१६ | ०.३२ |
| वजा-इतर व्यवसायातील मिळकत | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **निव्वळ महसूल खर्च** | **१०६.८७** | **१०१.९४** | **५३.३५** | **५२.३९** | **१०५.७३** |

१.१४ एमवायटी रेग्युलेशनच्या रेग्युलेशन ११.६ नुसार माननीय आयोगाने राहिलेल्या आर्थिक वर्षांच्या अंदाजपत्रकामध्ये मिड टर्म परफॉरमन्स पुनरावलोकन करताना बदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार जेपीटीएलने आर्थिक वर्ष २०१५-१६ चे दुरूस्त केलेले अंदाजपत्रक जे माननीय आयोगाने एमवायटी ऑर्डर दि. १६/०८/२०१३ नुसार मान्य केले आहे.

| **तपशील (सर्व संख्या करोडमध्ये)** | **पूर्वीचा अंदाज (एमवायटी याचिका)** | **मान्य (एमवाटी ऑर्डर)** | **अंदाजे** |
|---|---|---|---|
| दुरूस्त व देखभाल खर्च | ११.०७ | ६.८६ | ६.८६ |
| एएडी व अनुषंगिक संपत्तीच्या कर्ज फेडीची तरतूद यांच्या घसाऱ्यासहित | २९.२८ | २९.०५ | २९.३४ |
| दीर्घ कालावधीचा स्थावर मालमत्तेवरील व्याज | ३३.७० | ३३.४८ | ३४.५१ |
| लाईनच्या उपभोक्त्यांकडील चालू भागभांडवलावरील खर्च | २.०९ | १.९४ | २.०० |
| इक्विटी भांडवलावरील परतावा | २१.५५ | २१.३२ | २१.६३ |
| अनुषंगिक राखीव निधीसाठी योगदान | १.३९ | १.३८ | १.३९ |
| प्राप्ती कर | ५.३९ | ५.३५ | ६.९१ |
| **एकूण महसुली खर्च** | **१०४.४७** | **९९.३९** | **१०२.६५** |
| वजा-टॅरिफ व्यतिरिक्त मिळकत | ०.४३ | ०.५४ | ०.४४ |
| वजा-इतर व्यवसायातील मिळकत | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **निव्वळ महसूल खर्च** | **१०४.०४** | **९८.८५** | **१०२.२१** |

**१.१५ या याचिकेनुसार जेपीटीएल माननीय आयोगाकडे पुढीलप्रमाणे विनंती करीत आहे.**

अ) आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ एकूण महसुली खर्चाचा ट्रु-अप, आर्थिक वर्ष २०१४-१५ चा अंदाजे एकूण खर्च आणि आर्थिक वर्ष २०१४-१५ चा सुधारित महसुली खर्च यांना मान्यता द्यावी.

ब) आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ चे भांडवली खर्च आणि इन्सुलेटर बदलल्यामुळेचे भागभांडवल कमी करण्यासाठी मान्यता द्यावी.

क) आर्थिक वर्ष २०१२-१३ आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ चा वहन खर्च आणि ट्रान्समिशन लाईन अव्हेलेबिलिटी इन्सेटिव्हसहित एकूण महसुली खर्चाचा ट्रु-अप मान्य करावा.

ड) आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ चे एकूण महसुली खर्चाचे अंदाजपत्रक या याचिकेप्रमाणे मान्य करण्यात यावे.

ई) आर्थिक वर्ष २०१२-१३ चा दोन महिन्यांचा मुदत होऊन गेलेला एकूण महसुली खर्च रू. १४.४६ करोड जो दि. १४/०८/२०१४ च्या टेरिफ ऑर्डरमध्ये राहून गेला होता, वहन खर्चासोबत आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या टेरिफ बरोबर मान्य व्हावा.

फ) जर काही त्रुटी, चूक, अपूर्णता असेल तर त्याकडे दुर्लक्ष करून जेपीटीएलला सदर अर्जामध्ये वाढ/बदल/दुरूस्ती/सुधारणा करण्याची अनुमती देऊन भविष्यातील गरजेनुसार पुन्हा दाखल करण्याची अनुमती द्यावी.

ज) या विषयातील तपशील आणि परिस्थितीला अनुरूप ठरतील अशा प्रकारचे आदेश आणि पुढील कार्यवाही जारी करावी.